# प्रेसनोट

ला.प्र.वि,वाशिम.

दि.०४/०६/२०२६

आरोपी क्र.१) खाजगी ईसम,दत्तात्रय उर्फ बबन मिटकरी,सरपंच पती वय–अंदाजे ५५ वर्षे, रा.ढोरखेडा ,ता.मालेगाव जि.वाशिम यांनी तक्रारदार यांचे बांधकामाच बिलाचे हस्तांतरण पावतीवर सरपंच यांची सही/शिक्का देण्या करीता दि.०३/०६/२०२६ रोजी पडताळणी कारवाई दरम्यान ४०,०००/– रुपये लाचेची स्पष्ट मागणी करुन तडजोडी अंती २५,०००/– रुपये स्विकारण्याचे मान्य केले. आरोपी क्र.०२) ईलोसे सौ.सुनिता दत्तात्रय मिटकरी,सरपंच ग्राम ढोरखेडा यांनी दि.०३/०६/२०२६ रोजी पडताळणी कारवाई दरम्यान लाचरक्कमेस सहमती दर्शवुन दि. ०४/०६/२०२६ रोजी सापळा कारवाई दरम्यान २५,०००/–रू लाच रक्कम पंचासमक्ष स्विकारली.

| | |
|---|---|
| आरोपी नांव हुद्दा व पत्ता | १)खाजगी ईसम दत्तात्रय उर्फ बबन मिटकरी, सरपचपती वय–अंदाजे ५५ वर्षे,खाजगी ईसम रा.ढोरखेडा ,ता.मालेगाव जि.वाशिम<br>२) सौ.सुनिता दत्तात्रय मिटकरी,सरपंच ग्राम ढोरखेडा. वय ४७ वर्ष,रा.ढोरखेडा ता. मालेगाव जि.वाशिम |
| लाच स्विकारल्याची रक्कम | २५,०००/– रुपये |
| लाच मागण्याचा हेतु | तक्रारदार यांचे हस्तांतरण पावतीवर सही/शिक्का देण्याकरीता२५,००० रुपये लाचेची मागणी करुन स्विकारले आहे. |
| सापळा अधिकारी | श्रीमती अलका गायकवाड,पोलीस निरीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,वाशिम. |

दि.०२/०४/२०२६ रोजी तक्रारदार पुरुष वय ३१ वर्ष यांनी तक्रार दिली की, तक्रारदार यांचे हस्तांतरण पावतीवर सही/शिक्का देण्याकरीता गैरअर्जदार हे ४०,००० रुपये लाच मागणी करीत आहेत.

दि.०३/०६/२०२६ रोजी पडताळणी कारवाई दरम्यान ४०,०००/– रुपये लाचेची स्पष्ट मागणी करुन तडजोडी अंती २५,०००/– रुपये स्विकारण्याचे मान्य केले. आरोपी क्र.०२) सौ.सुनिता दत्तात्रय मिटकरी,सरपंच ग्राम ढोरखेडा यांनी दि.०३/०६/२०२६ रोजी पडताळणी कारवाई दरम्यान लाचरक्कमेस सहमती दर्शवुन दि. ०४/०६/२०२६ रोजी सापळा कारवाई दरम्यान २५,०००/–रू लाच रक्कम पंचासमक्ष स्विकारली. ईलोसे सौ. सुनिता दत्तात्रय मिटकरी,सरपंच ग्राम ढोरखेडा यांचे कडुन लाच रक्कम २५,०००/– रु हस्तगत केली. वरील दोन्ही आरोपी विरुध्द सदर प्रकरणी भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम १९८८ चे कलम ७,७A प्रमाणे गुन्हा दाखल करण्याची कारवाई सुरु आहे.

सदर कार्यवाही मा.पोलीस अधिक्षक, श्री बापू बांगर, अपर पोलीस अधिक्षक श्री सचिंद्र शिंदे, अ‍ॅन्टीकरप्शन ब्युरो अमरावती, यांचे मार्गदर्शनात व पर्यवेक्षण अधिकारी पोलीस उप अधिक्षक श्री जगदिश परदेशी, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,वाशिम यांचे सह तपास अधिकारी पोलीस निरीक्षक श्रीमती अल्का गायकवाड यांचे पथकातील कर्मचारी पोहवा नितीन टवलारकर, विनोद मारंकडे,योगेश खोटे,मपोहवा.योगीता गायकवाड, पो.कॉ महेश परमेश्वरे, चापोशि मंगेश देवकते ला.प्र.वि.वाशिम यांनी केली.

शासकिय लोकसेवकाने, खाजगी इसमाने शासकिय काम करुन देण्यासाठी व करण्यासाठी लाचेची मागणी केल्यास त्याबाबत अ‍ॅन्टीकरप्शन ब्युरो,वाशिम दुरघ्वनीक्रमांक ०७२५२/२३५९३३ टोल फ्रि.नं.१०६४ मोबाईल क्रमांक–७५०७०५५२०५ यावर संपर्क साधण्याचे आवाहन जगदीश परदेशी,पोलीस उपअधिक्षक अ‍ॅन्टीकरप्शन ब्युरो, वाशिम यांनी केले आहे.

(जगदीश परदेशी)
पोलीस उपअधिक्षक, ला.प्र.वि.,वाशिम.